# पदभरती निवेदन

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## उपसंचालक, आरोग्य सेवा छत्रपती संभाजीनगर परिमंडळ छत्रपती संभाजीनगर

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत **उपसंचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर, बाबा पेंट्रोलपंपासमोर, जालना रोड, महावीर चौक, छत्रपती संभाजीनगर** यांच्या मार्फत **उपसंचालक कार्यालयातील व प्राचार्य विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र यांच्या अधिनस्त** विविध संवर्गातील रिक्त पदांची, कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत आहेत. (एम.बी.बी.एस. वैद्यकिय अधिकारी-१, नर्सिंग ऑफिसर-१ व फॅसिलीटी मॅनेजर E-HMIS - १)

सदरील पदभरती जाहिरात, पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, सामाजिक आरक्षण, नियुक्तीचे ठिकाण, अर्जाचा नमुना, नियम, अटी व शर्ती हया राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई येथील संकेतस्थळ www.arogya.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेले असून, उमेदवारांनी संकेतस्थळावरुन अर्जाचा नमुना Download करुन, जाहिरातीतील आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह अर्ज समक्ष सादर करण्यासाठी या निवेदनाव्दारे आवाहन करण्यात येत आहे.

(स्वाक्षरीत)
उपसंचालक,
आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर
परिमंडळ छत्रपती संभाजीनगर

# जाहिरात नमुना सन २०२२-२३

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## उपसंचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर .

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यांत येणाऱ्या कार्यक्रमांसाठी खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे **कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (११ महिन्याकरिता)** खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

उपसंचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर

| अ.क्र. | पदाचे नांव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रति माह एकत्रित मानधन | आवश्यक अनुभव | नियुक्तीचे ठिकाण | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | ०१ | M.B.B.S. | वय वर्ष ७० पर्यंत | ६०,०००/- | शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | स्किल लॅब, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना. | ०१ (खुला - ०१) |
| २ | नर्सिंग ऑफिसर | ०१ | B.Sc. Nursing | वय वर्ष ६५ पर्यंत | २५,०००/- | शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | | ०१ (खुला - ०१) |
| ३ | फॅसिलीटी मॅनेजर E-HMIS | ०१ | M.C.A./B.Tech or Equivalent | वय वर्ष ३८ पर्यंत | २५,०००/- | १ वर्ष | उपसंचालक , आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर | ०१ (खुला - ०१) |

- राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

**उपसंचालक आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद रिक्त असणा-या पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर रिक्त पदांसाठी अर्ज स्विकारण्याची मुदत दि.२१/०२/२०२४ पासुन ते दिनांक ०७/०३/२०२४ रोजी पर्यंत सकाळी १०.०० वाजेपासुन ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यत (सुट्टीचे दिवस वगळुन) समक्ष स्विकारण्यात येतील. तसेच दिनांक ०७/०३/२०२४ रोजी नंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. तसेच ई.मेलद्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :-** उपसंचालक आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर मंडळ छत्रपती संभाजीनगर , बाबा पेंट्रोलपंपासमोर, जालना रोड, महावीर चौक, छत्रपती संभाजीनगर .४३१००१

## अटी व शर्ती -

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवांरासाठी रु १५०/- व राखील प्रवर्गातील उमेदवारांसाठी १००/- धनाकर्ष (Demand Draft) जोडणे आवश्यक आहे. सदरचा धनाकर्ष (Demand Draft) Deputy Director Health Services Aurangabad या नावाने काढावा. धनाकर्ष (Demand Draft) राष्ट्रीयकृत बॅकेचा असावा. ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयास पाठविण्यात आलेला धनाकर्ष ग्राह्य धरण्यात येणार नाही. धनाकर्ष हा ऑफलाईन पध्दतीनेचे अर्जासोबत जोडून सादर करण्यात यावा.

२) उपरोक्त नमुद केलेले पद हे मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र. राआसो/मनुष्यबळ/पुनर्नियुक्ती मार्गदर्शक सुचना/१२५०४१-४४३/२०२२ दि.२८/१०/२२ रोजीच्या पत्रान्वये रुजू दिनांकापासून दि.२९-०६-२०२४ पर्यंतच्या कालावधीकरीता राहील. सदरील कालावधीमध्ये काम समाधानकारक असल्यास एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील कार्यकाळासाठी पुनर्नियुक्ती आदेश सक्षम अधिकाऱ्यांकडून दिले जातील. सन २०२३-२४ च्या कृती आराखडयामध्ये सदरच्या पदाची मंजुरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा आपोआप संपुष्टात येईल.

३) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसुन, निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.

४) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५) सर्व पदांसाठी उमेदवारांनी सर्व शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, तसेच पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष), पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणूण (१० वी व १२ वी चे प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित/स्वसाक्षांकित) जोडावीत. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ड ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहील.

६) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

७) अर्ज सादर करणेकामी व मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

८) सदर रिक्त पदांच्या संख्येत, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. उपसंचालक, आरोग्य सेवा **छत्रपती संभाजीनगर** मंडळ **छत्रपती संभाजीनगर** यांनी राखुन ठेवलेले आहेत.

९) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१०) अर्जाचा नमुना हा **www.arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

११) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

१२) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात येवुन, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

१३) अर्जदारांनी एका पेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र धनाकर्ष जोडने आवश्यक आहे.

१४) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाचे लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापणाचा नमुना स्वसांक्षाकित करुन अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

१५) अर्जामध्ये दिलेल्या माहीतीच्या आधारे उमेदवाराची पात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल. तथापी अर्ज स्विकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या पदाकरीता पात्र आहे असा होणार नाही. निवड प्रक्रीये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडी नंतर अर्ज विहीत अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी व / वा निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

१६) पदभरती बाबत पात्र अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आणि पदभरती बाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी या कार्यालयाच्या विभागीय संकेत स्थळावर **(www.arogya.maharashtra.gov.in)** प्रकाशित करण्यात येतील. या करीता वेळोवेळी संकेतस्थळी भेट देणे देखील बंधनकारक आहे. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

१७) अर्ज भरत असतांना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टककेवारी अचुकपणे नमुद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमुद न करता गुणांची टककेवारी नमुद करणे आवश्यक आहे. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्या संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणीत करुन घ्यावे व त्याची स्वाक्षांकित प्रत आपण मुलाखतीस पात्र झाल्यास कागदपत्र छानणी दरम्यान सादर करावे.

१८) अर्ज करीत असलेल्या पदाकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अतिरिक्त आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्याची दखल घेतली जाणार नाही.

१९) अनुभवाचा तपशील नमूद करताना पहिली नियुक्ती कालावधी ते सध्याची नियुक्ती कालावधी या क्रमानेच द्यावा.

२०) अनुभवाचा तपशील नमुद करीत असताना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच कार्यालयाचा तपशील फॉर्म मध्ये नमुद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

२१) अनुभवाचा तपशील नमूद करताना रुजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. दोनही तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास अशा अनुभवाचा विचार करण्यात येणार नाही.

२२) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

२३) सदर पदभरतीच्या प्रक्रियेचे सर्व अधिकार मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवले आहेत.

२४) सदर पदांपैकी वैद्यकिय अधिकारी एम.बी.बी.एस. हे पद थेट मुलाखती घेवुन भरण्यात येईल व उर्वरीत नर्सिंग ऑफिसर व फॅसिलीटी मॅनेजर E-HMIS या पदांची निवड ही खालील तक्त्यामध्ये नमुद प्रमाणे मा. उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्या मान्यतेने निकष लावून निवड गुणानुक्रमे खालील निकषानुसार करण्यात येईल.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टककेवारीचे ५० प्रमाणे Proporation काढावे (उदा.६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proporation = 60 *50/100=30) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणीक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत मिळालेल्या एकूण गुणांच्या टककेवारीचे २० प्रमाणे Proporation काढावे (उदा.१. Staff Nurse पदांची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc. (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc. (Nursing) च्या अंतीम वर्षात ६०% प्रमाणे गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proporation = 60 *20/100=12 गुण) | २० गुण |
| संबंधीत पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकुण १०० गुण |

(स्वाक्षरीत)
अध्यक्ष तथा
उपसंचालक, आरोग्य सेवा
छत्रपती संभाजीनगर,
परिमंडळ छत्रपती संभाजीनगर

# कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, उपसंचालक, आरोग्य सेवा छत्रपती संभाजीनगर, परिमंडळ छत्रपती संभाजीनगर .

| |
|---|
| पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वतः साक्षांकित करुन लावावे. |

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रः-

प्रति,
मा. उपसंचालक,
आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर .

**पदाचे नावः**------------------------------------

१) उमेदवारांचे संपूर्ण नांव :-----------------------------------------------

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव :-----------------------------------------------

३) जन्म तारीखः-वर्ष .............. महिना .............. दिवस ............

अक्षरी जन्म तारीख-------------------------------------------------------------

वय :- .......... वर्ष, ............महिने, ........ दिवस (जाहिरात प्रसिध्द झाले त्या दिवशी )

४) पत्र व्यवहाराचा पत्ता :-

-----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

(मोबाईल क्र.:- ..............................................) (नमुद करणे अनिवार्य)
(ई मेल **ID**.:- ..................................................)

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे:- होय/नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :-होय/नाही

जातीचा प्रवर्ग :------------------ जातीचे नाव :------------------

- अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :------------------ (नमुद करणे अनिवार्य)

७) धनाकर्ष क्रमांक व दिनांक व रक्कम :- ..................................................(नमुद करणे अनिवार्य)

८) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही:-आहे/नाही

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | अंतिम वर्षात मिळालेले गुण | अंतिम वर्षाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) **अनुभव** :-अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ. क्रं. | काम केलेल्या कार्यालयांचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**११) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.** (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१)...................................... २)......................................

३)...................................... ४)......................................

५)...................................... ६)......................................

७)...................................... ८)......................................

९)...................................... १०)......................................

१२) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा अणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.तसेच जाहिरातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

**ठिकाण** :- ......................... **स्वाक्षरी** :- ........... ........................

**दिनांक** :- / /२०२४ **अर्जदारांचे नांव**:- -------------------------

## <u>महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाचे लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापणाचा नमुना</u>

**प्रतिज्ञापन**

**नमुना - अ**

(नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कुमारी .................................................................................

श्री. .......................................................................... यांचा/यांची

मुलगा/मुलगी/पत्नी, वय ......... वर्ष, राहणार ...........................................................

...................................................................................................................

याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी .................................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ......... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ................................ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

(उमेदवाराची स्वाक्षरी)

**ठिकाण :-**

**दिनांक :- / /**